# असा तो,
# अशी ती



प्रवीण मिशाळ

# असा तो, अशी ती

प्रवीण मिशाळ

ई साहित्य प्रतिष्ठान

# असा तो, अशी ती (कथासंग्रह)


लेखक : प्रवीण मिशाळ


mishall. praveen@gmail. com

Address - 2170 Hassell Rd, Apt 305, Hoffman Estates, IL 60169 USA

Phone Number - +1 312 509 5376



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन :१६ डिसेंबर २०१६

©esahity Pratishthan®2016

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईसाहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे - आवश्यकआहे.

# मनोगत

कथा त्याच्या आणि तिच्या. रोज आजूबाजूला घडणाऱ्या. काही तुम्ही स्वतः अनुभवलेल्या. हे आहेत फक्त अनुभव, काही खरे काही काल्पनिक. तसे पाहता काल्पनिक असं काहीच नसतं. कल्पनांचं बीज कोठेतरी सत्यातच रोवलेलं असतं. त्यामुळे त्यांच्या ह्या कथा वाचताना तुम्हाला कुठेतरी आपलेच अनुभव आठवतील. आणि ते तुम्हाला घेऊन जातील तुमच्या आठवणींच्या खजिन्याकडे. तुम्ही जर तिकडे पोहोचलात तर माझं इप्सित साध्य झालं म्हणून समजा.

हा माझा काही तरी लिहिण्याचा पाहिलंच प्रयत्न त्यामुळे तुमच्या प्रतिक्रिया आणि प्रोत्साहन ह्यांची नक्कीच मला गरज भासेल तेव्हा नक्की तुमचा अभिप्राय पाठवा.

थोडंसं माझ्याविषयी - मी प्रवीण मिशाळ, मुंबई पुण्यात मोठा झालो. व्यवसायाने एका आंतरराष्ट्रीय कंपनीत सल्लागार म्हणून काम करतो. सध्या राहायला अमेरिकेत शिकागो येथे. फोटोग्राफी आणि ओरिगामी ह्यांची लिखाणासोबत आवड.

माझ्याबद्दल जास्त सांगायचं झालं तर मी गेले नऊ वर्ष तंत्रज्ञान क्षेत्रात कार्यरत आहे. आणि सध्या एका consulting कंपनीमध्ये सल्लागार म्हणून काम करते. नोकरीनिमित्त अमेरिकेत फिरण्याची संधी मिळते. तिचा वापर इथल्या लोकांशी बोलण्यात, त्यांचे मतप्रवाह, आचार विचार समजण्यात घालवतो. ना जाणो हेसुद्धा पुढेमागे काहीतरी लिहिण्यास प्रवृत्त करेल. जसं मी माझ्या पुस्तकात लिहिले आहे कि पूर्णतः काल्पनिक असा काहीच नसतं. त्यामुळे सध्या प्रेरणा गोळा करणे चालू आहे.

लेखनाचा इतिहास काही फारसा नाही. शाळेत असताना निबंध व वक्तृत्व स्पर्धेकरिता केलेल्या लिखाणानंतर फारसे काही लिखाण झाले नाही. वाचन मात्र खूप झाले. व. पु. काळे माझे आवडते लेखक. मात्र मध्यंतरी वाचनाची नाळसुद्धा काही काळासाठी तुटली होती. पण ईसाहित्याने ती पुन्हा जोडली. आणि आमच्यासारख्या भारतात नसणाऱ्यांसाठी तर हि पर्वणीच. त्यामुळे ईसाहित्याचे खूप आभार.

सध्याच्या प्रोजेक्टबद्दल सांगायचं झालं तर असा मी अशी तू चे दुसरे पर्व लिहायचा मानस आहे. एक वैज्ञानिक गूढकथा मनात घोंगावत आहे जी लिहिण्यास सुरवात केली आहे. फोटोग्राफीबद्दल फोटोचे पुस्तक प्रकाशित होत असेल तर त्याहीबद्दल विचार आहे.

धन्यवाद. संपर्कात राहूच.

प्रवीण

mishall. praveen@gmail. com

# अर्पणपत्रिका

हे पुस्तक माझ्या जन्मदात्या आई वडिलांना ज्यांनी मला लहानाचं मोठं केलं

आणि जी सदा सर्व काळ माझ्या पाठीशी खंबीरपणे उभी असते

व ह्या गोष्टी लिहिताना माझी असलेली प्रेरणा माझी पत्नी ह्यांना अर्पण.

आणि त्याचबरोबर ह्या जीवनात भेटणाऱ्या

आणि आपल्याला रोज नवनवे अनुभव देऊन संपन्न करण्याऱ्या सर्व व्यक्तींना

आणि माझ्या वाचकांना अर्पण.

प्रवीण

# कथानुक्रम

1. जेव्हा ते भांडतात
2. जेव्हा ती घरी नसते
3. लपंडाव
4. तिचा शोध
5. तिचा वाढदिवस - भाग 1
6. तिचा वाढदिवस - भाग 2
7. एक खेळकर रविवार
8. एक रम्य संध्याकाळ

# जेव्हा ते भांडतात

तो ऑफिसमधून घरी आला. घरी शांतता होती. त्याला माहीत होते की ती घरीच आहे. पण नेहमीचा उत्साह घरी नव्हता. सर्वत्र सामसूम होती. त्याला माहीत होते की सकाळी झालेले भांडण अजून संपले नव्हते. ही तर वादळापुर्वीची शांतता होती जोपर्यंत कोणी तरी एक जण हार मानणार नव्हते. त्यांच्या लग्नाला अजून एक वर्षही झाले नव्हते आणि अशी भांडणं अधून मधून त्यांचं प्रेम वृद्धिंगत करायला व्हायला सुरु झाली होती.

जेव्हा तुम्ही तुमच्या जोडीदाराला व्यवस्थित ओळखता तेव्हा घरातल्या भिंतीसुद्धा तुमच्याशी संवाद साधू लागतात. तेव्हा त्याला हे पक्कं माहीत होतं की जोपर्यंत तो किंवा ती हार मानत नाही तोपर्यंत तरी हा तिढा काही सुटणार नव्हता. आणि त्याला हेसुद्धा माहिती होतं की आज अशा सर्व पूरक गोष्टी केल्या जातील जेणेकरून तो हरेल व तिला जिंकण्याचं समाधान मिळेल. पण आज तो इतक्या सहजा सहजी हार मानण्याच्या मूडमध्ये नव्हता. त्यामुळे घरी आल्यापासून तो आजच्या ह्या लुटूपुटूच्या भांडणासाठी तयार होता. आणि तीसुद्धा काही त्याला आज ओळखत नव्हती. त्यामुळे ती सुद्धा ह्या खेळाला पूर्ण तयार होती.

तो कपडे वगैरे बदलेपर्यंत तिने त्याच्यासाठी चहा बनवला. तो तयार होऊन TV समोर बसला. चहा त्याच्या समोर तिने ठेवला. अजून पर्यंत एक चकार शब्दही कोणी काढला नव्हता. त्याने चहा घेतला आणि तिथेच त्याला कळलं की तो तिला खूप व्यवस्थित ओळखतो. आणि सर्व गोष्टी अगदी ठरल्याप्रमाणे घडत आहेत. गोड आणि दुधाळ चहा. अगदी टपरीसारखा. By the way तिला गोड चहा अजिबात आवडत नाही आणि दुधाचा वास तर ती सहनही करू शकत नाही. पण आजची गोष्ट वेगळी आहे. आज त्याला हरवण्यासाठी सर्व काही माफ. म्हणतात ना प्रेमात आणि युद्धात सर्व काही माफ असतं म्हणून. हे सर्व ह्यासाठी की त्याने हार मानावी. पण तो सुद्धा काय कच्च्या गुरूचा चेला थोडाच आहे.

हे सर्व चालू असताना तो इथे विचार करतोय की सकाळी भांडायला झालं तरी काय होतं. शेवटी मुलगाच तो. त्याला थोडंच आठवतंय की झालं काय होतं ते. अरे हा आठवलं त्याला

सकाळी ऑफिसला जायला उशीर होत होता आणि त्याने जो शर्ट घातलेला तो काही फारसा घातलेल्या Pant ला सूट करत नव्हता. पण ते कारण तिला राग यायला पुरेसं होतं. आता हे काही कारण आहे का भांडायला? मग आलं भावनिक आवाहन की तू माझ्यासाठी एव्हढं पण करू शकत नाही. आणि त्याने साफ नकार दिला. चला मला आता कारण तरी आठवतंय भांडणाचं. हे त्याच्यासाठी पुरेसं होतं गोष्टी थोड्या वेळ अजून ताणून धरण्यासाठी. त्याला थोडंच जिंकायचं होतं. त्याला तर फक्त भांडणं थोडं लांबवायच होतं.

इथे तिलाही माहीत होतं की फक्त चहाने काही होणार नाही. आणि भांडणाचं कारण पाहता तर नाहीच नाही. पण शेवटी मुलगीच ती. तिची अपेक्षा होती की त्याने सकाळसाठी माफी मागावी. आता तो काही अविवाहित नाही. माझा नवरा आहे तो. तो असा गबाळयासारखा कसा बरं राहू शकतो? हे तर नक्कीच रागावण्यासारखं कारण आहे. ती तिचा मुद्दा पटवून द्यायला तयार होती. म्हणून तिने तिचा चहा संपवला आणि आत निघून गेली.

तो तिला आल्यापासून निरखत होता. आणि त्याला माहीत होतं की ती तिचा मुद्दा नक्कीच पटवून देईल. इतक्या छोट्या अवधीतसुद्धा त्याला हे तर नक्कीच कळू लागलं होतं की तिच्या मनात काय चालू आहे ते. आता उत्सुकता एवढीच होती की ती नक्की काय बरं करणार. आणि हेसुद्धा ठरलेलं की जे करणार ते नक्कीच काही तरी भन्नाट असणार.

आणि तिनेसुद्धा त्याला बिलकुल निराश केलं नाही. ती बाहेर आली, केस पिंजारलेले, चेहरा विदुषकासारखा रंगवलेला, झोपायचे कपडे घातलेले, आणि वर दुपट्टा घेतलेला, दोन पायात दोन वेगवेगळे शूज, पाठीवर मिकी माउसची bag आणि प्रत्येक नख वेगवेगळया रंगात रंगवलेलं. आली आणि म्हणाली चल मला खरेदीला जायचंय.

तो तर हसून हसून वेडा झाला. सोफ्यावरून हसत हसत खाली पडला. शेवटी जेव्हा हसणं जेव्हा आटोक्यात आलं तेव्हा तिला म्हणाला ठीक आहे मी हरलो. आता जा आणि पहिले ते चमकणारे रंग काढ बोटांवरचे. आणि मी तुला वचन देतो की परत गबाळयासारखे कपडे नाही घालणार…

# जेव्हा ती घरी नसते

तो ऑफिसमधून घरी आला आणि दारावरची बेल त्याने वाजवली. आतून काहीच प्रतिसाद आला नाही. त्याने पुन्हा बेल वाजवली. ह्यावेळी थोड्या जास्त वेळ आणि थोड्या रागाने. आज तिला दरवाजा उघडायला एवढा वेळ का लागत आहे? आणि तेवढ्यात त्याला आठवलं की ती तर घरीच नाहीये. तो स्वतःशीच हसला. ती गेली होती बराच वेळापासून तिचा रखडलेला पासपोर्ट काढायला. आणि येताना तिच्या आईचं घर रस्त्यातच असल्यामुळे आज ती तिथेच राहणार होती.

त्याने किल्लीने दरवाजा उघडला. आणि तो दरवाजा बंद करणार तेवढ्यात त्याला दरवाजाच्या मागे एक स्टिकी नोट सापडली. त्यावर लिहिल होतं – 'गुड इव्हनिंग. कसा होता आजचा दिवस?' तो पुन्हा स्वतःशीच हसला आणि म्हणाला दिवस तर बरा होता पण तू घरी नसल्याने रात्र काही सुखाची जाणार नाही आज. आणि तो विचार करू लागला की इतक्या कमी दिवसांमध्ये तो तिच्यावर केवढा अवलंबून राहू लागला होता की अगदी छोट्या छोट्या गोष्टींसाठीसुद्धा आता त्याला तिची गरज भासत असे. रोज ऑफिसमधून घरी आल्यावर दरवाजा उघडणारा तिचा प्रसन्न चेहरा आठवून तो थोडा हिरमुसला. तो विचार मनात येताच त्याच्या चेहऱ्यावरचं हास्य थोड मालवलं. पण तो काही स्वार्थी नव्हता. तिने लग्नानंतर पहिल्यांदाच विचारलं की मी आज येताना रात्री माझ्या आईकडे राहू का? मग तो नाही कसं म्हणणार? पण त्याच्या नजरेतली हूर हूर तिने टिपली हेसुद्धा त्याने हेरलं होतं. त्याच्या आवाजातला होकारात दडलेला नकार तिच्यापर्यंत पोहोचला होता जेव्हा त्याने तिच्या नजरेला नजर न मिळवता म्हटले - हे पण काय विचारणं झालं, ऑफ कोर्स तू आईकडे आज राहू शकतेस. तू तर मला विचारायची पण गरज नाही. शेवटी आपण पती पत्नी आहोत. मी काय तुझा बॉस नाही माझ्याकडून रजेची परवानगी घ्यायला. तू स्वतःचे निर्णय घ्यायला मोकळी आहेस आणि

ते तू बरोबरच घेशील याची मला खात्री आहे. त्यामुळे तू निःसंशय आज तुझ्या आईकडे राहू शकतेस.

ह्या सर्व विचारात त्याला जाणवलं की आपण अजून दारातच एका हातात स्टिकी नोट घेऊन मूर्तीसारखे उभे आहोत. गाढ विचारात त्याने अजून बूटसुद्धा काढले नव्हते. त्याने बूट काढले आणि ते ठेवायला तो कपाटाकडे गेला. आणि काय आश्चर्य अजून एक स्टिकी नोट - 'माझाच विचार करत होतास ना. मीपण असाच तुझा विचार करत असते' त्याला गम्मत वाटली अंतराने इतक्या दूर असूनही ते मनाने इतके जोडलेले असल्याची.

मग त्याने स्वतःला मस्तपैकी सोफ्यावर पसरून दिलं आणि TV चा रिमोट हातात घेतला तर अजून एक स्टिकी नोट रिमोटच्या मागच्या बाजूला चिकटवलेली - 'मला माहित होतं की कपडे बदलण्यापूर्वी तू TV लावशील म्हणून'. आता हे जरा अतीच होतंय. ती काय माझ्यावर हेरगिरी करतेय का? आणि तो कपडे बदलायला गेला.

इतक्या दुरूनही ती माझ्यावर कशी बरं हुकूमत गाजवू शकते.  This is not fair. आणि आज जेव्हा ती घरी नाहीये तर मी मीच माझ्या मर्जीचा मालक आणि मला जे हवं तेच मी करणार. आणि त्याने फ्रीजचा दरवाजा उघडला पाणी प्यायला तर अपेक्षेप्रमाणे तिथेही एक स्टिकी नोट - 'स्वतःसाठी चहा बनवून घे. आळशीपणा करू नकोस. ' तो स्वतःलाच म्हणाला, आज मी बनणार आळशी तू नाहीयेस ना घरी मग तर नक्कीच.

त्याने चहा बनवण्याचा विचार मनातून काढून टाकला आणि घरभर उरलेल्या स्टिकी नोट्स शोधू लागला. आणि त्याला अजून बऱ्याच मिळाल्याही. एक जेवण्याच्या tableवर - 'जेवण फ्रीजमध्ये ठेवलं आहे. Microwaveमध्ये गरम करून खा. ता. क. - Microwave कसा वापरायचा ते नाही कळलं तर मला फोन कर'. एक नोट होती Microwaveवर - 'जेवण थोडं तिखट झालं आहे. पण उपाशी राहू नकोस. खूप तिखट लागलं तर फळं खा'. फळांजवळ अजून एक नोट – फळं खाल्यावर लगेच पाणी नको पिऊ. पोटात दुखेल'. हे आता अलिबाबाच्या गुहेतल्या खजिन्यासारखं झालं होतं. शेवटी त्याला अजून एक नोट कपड्यांच्या कपाटाजवळ

मिळाली - 'तो निळया रंगाचा शर्ट घाल उद्या ऑफिसला. छान दिसतो तो तुला'. तो मनातल्या मनात म्हणाला जेव्हा तू घरी नाहीयेस तेव्हा तरी मला ठरवू देत की काय घालायचं आणि काय नाही ते.

यशस्वीपणे सर्व स्टिकी नोट्स गोळा करत तो परत हॉलमध्ये आला आणि TV पाहू लागला. TV बघण्यात, जेवण Microwave मध्ये गरम करून जेवण्यात (तेसुद्धा मोठ्या कष्टाने Microwave चे मॅन्युअल वाचून, कारण त्याला हार मानायची नव्हती), फळं खाण्यात जेवण काही खूप तिखट नसतानाही, सगळयात शेवटी पाणी पिण्यात (तेसुद्धा थोड्या वेळानंतर तिने सांगितल्याप्रमाणे) 3-4 तास गेले असतील.

रात्रीचे अकरा वाजले असतील जेव्हा दारावरची बेल वाजली. कोण आलं एवढ्या रात्री असा विचार करत त्याने दरवाजा उघडला आणि त्याच्या चेहऱ्यावरचे हावभाव बदलले. पहिले विस्मयकारक, मग आश्चर्य, मग स्तब्ध, कॉम्पुटरमध्ये virus गेल्यावर तो जसा स्तब्ध होतो तसं आणि शेवटी आनंद. दरवाज्यात ती उभी होती त्याच नेहमीच्या हसऱ्या चेहऱ्यासह आणि डोळयात खास चमक घेऊन. त्याला कळलं की त्याने तिला पुरेसा दारुगोळा दिला होता त्याची नंतर खेचायला त्याने दिलेल्या वेगवेगळया हावभावांमुळे. पण त्याला त्याची पर्वा नव्हती. तिच्या परत येण्यासमोर ते काहीच नव्हतं. ती शेवटी म्हणाली आता जर तू बाजूला होशील तर मी आत येऊ?

तिने त्याला सांगितलं की त्याच्या नजरेतला नकार तिने वाचला होता आणि तिला आईच्या घरी झोपच येत नव्हती. म्हणून तिने बॅग पॅक केली व सरळ त्याच्याकडे निघून आली.

पक्की चहाबाज असल्याने तिने विचारलं चहा घेणार का? मी माझ्यासाठी बनवणारच आहे.

स्वयंपाकघरात शिरत तिने पुढचा प्रश्न विचारला – ‘तू चहा बनवलास का घरी आल्यावर?’ त्याला माहित होतं की हाच तो क्षण आणि तो तयार होता. जर त्याने म्हटलं की नाही केला तर

तो झाला असता आळशी आणि मग तिने त्याला चिडवलं असतं. म्हणून तो बिनधास्त म्हणाला – 'केला ना'. तसाही तिला कसा कळणार चहा केला की नाही ते?

ती स्वयंपाकघरातून जोरात हसत बाहेर आली व म्हणाली ' नाही माझ्या राजा तू चहा नाही केलास'. त्याने विचारला 'कशावरून?'. तिने खट्याळ डोळयांनी त्याच्याकडे बघत म्हटलं, 'कारण चहा पावडरच्या डब्यावर लावलेली ही स्टिकी नोट अजूनही तशीच आहे'. त्याने अक्षरशः तिच्या हातातून ती नोट खेचून घेतली. त्याच्यावर लिहिलं होता - 'आज सूर्य पश्चिमेला कसा बरं उगवला? चक्क तू स्वतः चहा बनवतोयस?'

------



# लपंडाव

तो ऑफिसवरून घरी परत आला. त्याने त्याची बाईक त्याच्या घराच्या पार्किंग लॉटमध्ये पार्क केली. आणि तो विचार करू लागला की घरी लवकर आल्यामुळे तिची आज प्रतिक्रिया काय बरं असेल? सध्या त्याचा कामाचा व्याप खूपच वाढला होता. त्यामुळे सकाळी लवकर जाणं आणि रात्री उशिरापर्यंत न येणं हे रोजचंच झालं होतं. त्यामुळे घरी चहाच्यावेळी पोहोचणं हे तिच्यासाठी आश्चर्याचा धक्का ठरणार होतं. आणि तो तिचे आश्चर्याचे भाव टिपण्यास आतुर होता. म्हणून त्याने तिला फोन करून आधीच सांगितलं नव्हतं की तो ऑफिसमधून निघाला आहे जरी त्यांच्यामध्ये अलिखित नियम होता की ऑफिसमधून घरी निघताना एकमेकांना फोन करायचा. पण आजचा दिवस वेगळा होता. कारण त्याला तिला surprise द्यायचं होतं. आणि म्हणून आज तो ऑफिसमधून निघाल्यापासून थोडा हवेतच होता.

चहाच्या वेळी घरी पोहोचणे म्हणजे त्याच्या सध्याच्या दिनचर्येनुसार आश्चर्याचं होतं. पण आज ते खरंखुरं घडत होतं. आणि त्याची खात्री होती की स्वप्नातही ती विचार करणार नाही की मी एवढ्या लवकर घरी पोहोचेन म्हणून. आज तो त्यामुळे त्याच्या बॉसवर पण खुश होता. सध्याच्या स्पर्धेच्या युगात असे बॉस मिळणे दुर्मिळ झाले आहेत जे कंपनीचं भलं तर जाणतातच पण त्याचबाबोबर आपल्या सहकाऱ्यांच्या कौटुंबिक गरजा पण जाणतात.

पती पत्नीच्या नात्यांचे वीण घट्ट करण्यासाठी अशा छोट्या छोट्या गोष्टी पण खूप महत्वाच्या असतात ज्या नात्यांतली लज्जत वृद्धिंगत करतात. काळाची गरज म्हणत सुरु झालेल्या या जीवघेण्या स्पर्धेत आपण या छोट्या छोट्या गोष्टींचं महत्व विसरून जातो आणि नात्यांमधले बंध हळूहळू शिथिल करू लागतो. तेसुद्धा ह्या पातळीपर्यंत की ते शेवटी तुटावेत. खरंच नात्यांची किंमत एवढी कमी का झाली हा एक वादाचा विषय होऊ शकतो. पण एक नक्की की ज्या यशामागे आपण धावत आहोत त्यासाठी आपण काय किंमत चालू वेळेत चुकवत आहोत हे मात्र समजणे गरजेचे आहे.

असो, तो पार्किंग लॉटमधून लिफ्टकडे चालू लागतो. गेल्या काही दिवसांतले तिचे पेटंट dialogue मनात घोंगावत - तुलाच का एवढं काम असतं ऑफिसमध्ये? तू काय एकटा सगळयांच्या वाटणीचं काम करतोस का? त्यांना कळत नाही का की आता तुझं लग्न झालंय आणि मी घरी तुझी वाट बघते ते? आज मध्यरात्रीपर्यंत् तरी घरी येणार का? आज मी तुझ्यासाठी जेवायची बिलकुल थांबणार नाही. असं म्हणूनही ती रोज त्याच्याबरोबर जेवायला थांबायची. तेसुद्धा एक प्रघात म्हणून नाही तर त्याच्यावरच्या प्रेमापोटी आणि दोघांमधला संवाद टिकून राहावा म्हणून. सध्याच्या कामाच्या वेळांमुळे रात्रीचं जेवण ही एकच वेळ अशी उरली आहे की जेव्हा पती पत्नी एकत्र जेऊ शकतात. पण आजचा दिवस काही औरच असल्याने ते दोघे जेवणाबरोबर एकत्र चहासुद्धा घेणार होते.

हा सर्व विचार करत तो त्याच्या घरासमोर आला आणि दारावरची बेल वाजवली. आतून काहीच प्रतिसाद आला नाही. आणि तो परत बेल वाजवणार तेवढ्या त्याचा फोन वाजला. कोण बरं आता ह्या वेळी मला फोन करताय जेव्हा मी माझ्या घरी शिरणार आहे? तर तिचाच फोन असतो. आता हा कोणता नवीन खेळ असं म्हणत तो फोन उचलतो व म्हणतो 'हॅलो'.

पलीकडून तिचा उत्साहित आवाज येतो - 'कुठे आहेस तू? तुझ्यासाठी एक surprise आहे. मी आत्ता तुझ्या ऑफिससमोर उभी आहे. तसाही सध्या तू काही मध्यरात्रीशिवाय घरी येत नाहीस आणि आपल्याला सोबत घालवायला फारच कमी वेळ मिळतो म्हणून म्हटलं आज तुझ्या ऑफिसजवळच असलेल्या टपरीवर चहा पिऊ जेणेकरून आपल्याला अजून थोडा वेळ एकमेकांसोबत घालवता येईल. मग येतोयस ना चहासाठी?'

आणि तो विचार करतोय म्हणजे आजपण एकत्र चहा नाही. आपण विचारात एव्हढे गुंग होतो की हे आपल्या लक्षातच नाही आलं की तिची गाडी पार्किंगमध्ये नाहीये ते. . .

# तिचा शोध

तो ऑफिसमधुन घरी परत आला. त्याने दरवाजाची बेल वाजवली. आतून काही प्रतिसाद आला नाही. नेहमीप्रमाणे त्याने ऑफिसमधून निघताना तिला फोन करण्याचा प्रयत्न केला होता पण काही उपयोग झाला नाही. फोन बंद होता. सध्या फोनवर तिच्यापर्यंत पोहोचणं कठीण व्हायला लागलंय कारण तिचा फोन बिघडलाय. कधी तो चार्जच होत नाही तर कधी लवकर discharge होतो, तर कधी आपोआपच बंद पडतो आणि असं बरंच काही. जणू काही सर्व फोनची बिघडण्याची जबाबदारी त्याच्या खांद्यावर आहे. पण तिला मात्र त्याच्याशी काहीच देणंघेणं नाहीये. ती मात्र अजूनही खुश आहे तिच्या फोनवर आणि नवीन फोन घ्यायला काही तयार नाही. आणि त्याचा मात्र राग राग होतोय.

तो पुन्हा जास्त वेळासाठी दारावरची बेल वाजवतो पण काहीच प्रतिसाद नाही. थोडा रागावूनच तो किल्ल्यांचा जुडगा खिशातून काढतो. लग्नानंतर किल्लीने दरवाजा उघडणं यासारखं दुःख नाही तेसुद्धा तेव्हा जेव्हा रोज आनंदी चेहऱ्याने तुमची बायको तुमच्यासाठी दरवाजा उघडते. ज्याप्रमाणे लग्नानंतर मुलीच्या मुलाबद्दलच्या अपेक्षा बदलतात त्याचप्रमाणे मुलांच्यापण मुलींकडून काही अपेक्षा असतात. त्यातलीच ही एक. असो तर ती घरी नाहीये. तो किल्लीने दरवाजा उघडून आत येतो.

कुठे बरं गेली असेल ती? दिवसेंदिवस ती खूपच बेजबाबदार बनू लागलीये. तिने मला का नाही सांगितलं की मी घरी येईन तेव्हा ती घरी नसणार आहे. ती असं कसं बरं वागू शकते? हे सर्व प्रश्न मनात घोंगावत असताना त्याचे हात खिशातल्या फोनकडे गेले. त्याने तिला फोन लावला तर तो घरातच वाजला. आता हे जरा अतीच होतंय. फोनसुद्धा घरीच. म्हणजे तिच्यापर्यंत पोहोचण्याचा कोणताच मार्ग नाही. कुठे बरं असेल ती?

एक मिनीट. तिची कार पार्किंग लॉटमध्ये होती का? अरे हा होती. की नव्हती? नक्कीच होती. Surprise च्या घटनेनंतर तो आता लक्ष ठेवतो की तिची कार पार्किंग मध्ये आहे की नाही ते. म्हणजे ती जवळपासच कुठेतरी चालत गेलीये. मग येईल लवकरच. हे त्याचं अभियांत्रिकीचं लॉजिक घटनेची मीमांसा करणारं.

हा विचार करून त्याने कपडे बदलले आणि तो टीव्ही बघू लागला. तशीही ती जवळपासच गेलीये तर येईलच इतक्यात आणि मग बनवेल चहा दोघांसाठीसुद्धा त्याने विचार केला. हे थोडा क्रौर्यतेचं वाटेल तुम्हाला पण त्यांची कामांची वाटणी ठरलेली आहे. सकाळचा चहा त्याचा आणि संध्याकाळचा तिचा. आजकाल तो चहा करतो.

एक तास झाला. अजूनही तिचा काही पत्ता नाही. कुठे बरं असेल ती? त्याने पुन्हा सवयीने फोन उचलला तिला फोन करायला आणि त्याच्या लक्षात आलं की फोन तर घरीच आहे. आता मात्र त्याला तिची काळजी वाटायला लागलीये. तो शेजाऱ्यापाजाऱ्यांना विचारतो. पण त्यांना माहित नाही की ती कुठे आहे ते. तो मनातल्या मनात ठरवतो की ती घरी आली की तिला चांगलं फ़ैलावर घ्यायचं. पण ती परत कधी येणार? कुठे बरं असेल ती? दोन तास झाले त्याला येऊन आणि आता नऊ वाजायला आले तरी तिचा पत्ता नाही. ती बरी तर असेल ना. आता त्याच्या रागाची जागा काळजीने घेतलीये.

ह्या सगळ्या शोधाशोधीमध्ये अजून एक तास गेला. अजून काही तिच्या मैत्रिणींना फोन झाले पण कोणालाच माहित नाही की ती कुठेय. आता मात्र त्याला भीती वाटू लागलीये तेव्हड्यात दारावरची बेल वाजते. तो धावतच दरवाजा उघडतो तर दारासमोर ती.

तो तिला आत येतानाच तिच्यावर प्रश्नांची सरबत्ती चालू करतो - कुठे होतीस तू, सांगून जात येत नाही, असं वागतात का, वगैरे वगैरे. आणि तुला तुझा फोन बरोबर नेता येत नाही का? मोबाईलचा अर्थ कळतो का? तो काही घरी ठेवण्यासाठी नाही घेतला तर बरोबर नेण्यासाठी घेतला आहे आणि असं बरंच काही. त्याचा राग थोडा आवरल्यावर ती म्हणते की मोबाईलची बॅटरी नेहमीप्रमाणे अचानक डाउन झाली होती म्हणून तो चार्जिंगवर लावला आणि मी बाहेर

गेले. संध्याकाळपासून मी माझ्या शाळेतल्या मित्र मैत्रिणीसोबत होते जे खूप वर्षांनी भेटले मग गप्पा, जेवण आणि म्हणून उशीर झाला. थोडा शांत होत तो म्हणाला ते ठीक आहे पण तुला सांगता येत नाही का? त्यावर ती म्हणाली – 'घरी आल्यापासून तू काहीच खाल्लं नाहीस वाटतं? चहा करू?'

'तुला काय माहित की. . ' त्याचा प्रश्न पूर्ण होण्यापूर्वीच त्याला उत्तर मिळतं आणि चहा बिस्किटाच्या डब्यावर असलेली स्टिकी नोटसुद्धा ज्यावर लिहिलं होतं की मी शाळेतल्या मित्र मैत्रिणीसोबत बाहेर जात आहे. येताना उशीर होईल तेव्हा चहा नाश्ता करून घे. . आणि तो विचार करतोय – 'Not again. . . '



# तिचा वाढदिवस - भाग 1

आज तिचा वाढदिवस आणि इतर मुलींप्रमाचेच तिचा हा लग्नानंतरचा पहिला वाढदिवस असल्याने तिचा तो अविस्मरणीय ठरण्याची इच्छा असणे ह्यात गैर काहीच नव्हतं. आणि आता ती त्याला इतकं तर ओळखू लागली होती की तिची खात्री होती की तो आज तिचा वाढदिवस विसरल्याचं सकाळी नाटक करेल व संध्याकाळी तिला Surprise देईल. आणि तोसुद्धा तिने ओळखल्याप्रमाणे सकाळी तिला वाढदिवसाच्या शुभेच्छा पण न देता कामावर निघून गेला. जसं काही आज काही विशेष नाहीये आणि तिचा वाढदिवस तो साफ विसरलाय. आता खरं तर दोघेही एकमेकांना इतक्या चांगल्या प्रकारे ओळखतात की दोघांनाही माहित आहे की 'तू मारल्यासारखं कर मी रडल्यासारखं करतो' प्रकार चालू आहे ते. हे म्हणजे हिंदी रहस्यपटासारखं आहे की तुम्हाला पुढे काय होणार ते तुम्ही सहजपणे ओळखू शकता पण तरीही तो चित्रपट पाहता ह्या आशेवर की ह्यावेळी काहीतरी वेगळं घडेल.

आता इथे त्यालाही माहित आहे की तो नाटक करतोय हे तिला माहितीये आणि त्याला व्यवस्थित आठवतंय आज तिचा वाढदिवस आहे ते. कारण जर तुम्ही लग्नानंतरचा बायकोचा पहिला वाढदिवस विसरलात तर तुमची घरी आल्यावर काही खैर नाही असं समजा. त्यामुळे तिचं Surprise ठरवताना त्याच्यासमोर दोनच पर्याय होते. एक की हे सांगायचं की सध्या ऑफिसमध्ये खूप जास्त काम आहे त्यामुळे मला सुट्टी नाही घेता येणार आणि लवकर घरी यायचं किंवा दुसरा पर्याय असं दाखवायचं की त्याला तिचा वाढदिवस आठवतच नाही आणि सरळ सकाळी ऑफिसला जायचं आणि मग लवकर घरी परत यायचं. आणि त्याने दोघांमधला जास्त धोकादायक पर्याय निवडला. तरुणाईचं सळसळतं रक्त आणि स्वतःवर असलेला विश्वास त्याचं हे फलित. पण त्याची खात्री आहे की दिवसात नंतर घडणाऱ्या घडामोडीने तो त्याची व्यवस्थित भरपाई करेल.

लग्नानंतरची पहिली काही वर्ष ही सोनेरी वर्ष असतात आणि त्यात शक्य तितके तुमचे एकमेकांबरोबरचे अनमोल क्षण गोळा करायचे असतात जे तुम्हाला जन्मभर साथही देतात आणि पुढील जीवनासाठी जगण्याची उर्मी. हे ज्याने जाणले त्याने भविष्यासाठीची गुंतवणूक आजच केलीये असं समजा. तो त्या व्यक्तींपैकी एक आहे.

दोन तीन तास झाले असतील त्याला ऑफिसला जाऊन तेवढ्यात दारावरची बेल वाजते. ती तोच असल्याचं समजून मोठ्या आशेने दरवाजा उघडते तर कुरिअरवाला पोऱ्या. तो तिच्या हातात एक चिठ्ठी देतो. त्यावर लिहिलंय - 'प्रिये वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा. मला माहित आहे की तुलाही माहितीये मी तुझा वाढदिवस नाही विसरलो ते. आणि तू माझ्याकडून Surprise ची अपेक्षा ठेवणार ते. चल मग Treasure हंट खेळूया. आहेस तयार?' ती परत एकदा चिठ्ठीकडे बघते अजून काही कुठे लिहिलंय का ते. पण नाही. मी तर खेळायला तयार आहे पण करायचंय काय ते तर सांग ती मनातल्या मनात म्हणते. शेवटचा उपाय म्हणून त्या कुरिअरवाल्या पोऱ्याला पण शोधते पण तो तर केव्हाचाच निघून गेलाय. ती आता त्याच्यावर थोडी चिडलीये हि काय वेळ आहे का असले खेळ खेळायची? तेवढ्यात तिचा फोन वाजतो.

ती तिच्या फोनकडे पळते. फोनवर त्याचा message असतो – 'तुला चित्रपट बघायला आवडतात ना?' ती धावतच टीव्हीकडे जाते. तो काय माझेच पैंतरे माझ्यावर वापरतोय की काय? तो असा कसा विसरू शकतो की मी स्टिकी नोट्सची अनभिषिक्त राणी आहे ते? माझ्याकडे त्याचे मालकी हक्क आहेत. आणि हे तर त्या मालकी हक्कांचं उल्लंघन झालं. माझा मालकी हक्कांचा परतावा कुठेय? पण त्यासाठी पहिले त्याने घरी तर यायला हवं ना. पण टीव्हीवर तर एक पण स्टिकी नोट नाहीये. पण मग टीव्ही आणि चित्रपटांचं काय?

ती टीव्ही चालू करते. आणि पाहू लागते की कुठली नवीन CD आहे का CD प्लेअरमध्ये ते. आहे की नवी CD. ती नवीन CD लावते तेवढ्यात तिला त्याचा फोन येतो. ती CD pause करते

आणि फोन उचलते. तो म्हणतो – ‘वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा. एवढी तर तू हुशार आहेसच की तुला आतापर्यंत तुझ्यासाठी बनवलेली CD मिळालीच असेल. ’

‘अर्थातच मिळाली ना. तीच तर बघायला आता लावलीये. ’

तो तिला थांबवतो व म्हणतो – ‘हे काही बरोबर नाही. माझ्याशिवाय कशी काय तू CD बघू शकतेस? मला तुझ्यासोबत बघायची आहे. ’

ती विचारते – ‘तू कधी घरी येणार?’

तो म्हणतो – ‘आज खूपच जास्त काम आहे, पण प्रयत्न करीन की संध्याकाळी चहाच्या वेळेपर्यंत घरी पोहोचेन असं. तर चहा पीत दोघे पण बसून मग ती CD बघू. ’

ती म्हणते ‘नाही. मी एवढ्या वेळ नाही थांबू शकत. आणि माझी खात्री आहे की तू ती CD मुद्दाम घरी ठेवली नाही तर ती तू मला घरी आल्यावरच दिली असती. तू खरंच ऑफिसमध्येच आहेस ना?’

गाडी रुळावरून घसरतेय बघून त्याने म्हटलं – ‘ठीक आहे बघ तू CD पण फोन चालू राहू दे म्हणजे तुझ्या खास दिवशी मला तिथे असल्यासारखं तरी वाटेल. ’

ती म्हणते – ‘ठीकय’ आणि फोन चालू ठेवते. CD चालू केल्यावर छानपैकी सुंदर गाण्यावर त्यांच्या जीवनातले अनमोल क्षण पडद्यावर दिसू लागतात. ते पाहून ती त्याच्यावर खुश होते. त्याच्या गाण्याच्या व फोटोच्या निवडीवर पण ती फिदा आहे. तिची खात्री आहे की त्यानेच स्वतः ती CD बनवली आहे. फोनवर मधून मधून तोसुद्धा तिच्याशी बोलतोय आणि ती त्याचं कौतुक करतेय. CD संपायला येते. त्यांच्या शेवटच्या पिकनिकचे फोटो तेवढ्यात पडद्यावर दिसू लागतात तेवढ्यात एक विक्षिप्त दिसणारं भूत पडद्यावर येतं आणि सोबतीला किंचाळी. ती

सुद्धा दचकून किंचाळते. तो तिची किंचाळी ऐकतो आणि फोन ठेवतो. त्याचा हेतू साध्य झालाय आणि ती चिडलीये.

तो तुमच्या अपेक्षेपेक्षा तो जरा जास्तच धाडसी निघाला नाही? तिचा लग्नानंतरचा पहिला वाढदिवस आणि त्याने स्वःताच्या पायावर कुर्हाड मारलीय. आता बहुदा ब्रह्मदेवच धर्तीवर यायला हवेत त्याला वाचवण्यासाठी. नाही तर त्याची खैर नाही. मग तो तिला मनावण्यासाठी नक्की करतो तरी काय ते मात्र पुढील भागात… continued…



# तिचा वाढदिवस - भाग 2

मागील भागात त्याने तिच्या वाढदिवसासाठी एक CD बनवली होती आणि त्यात शेवटी एक विक्षिप्त भूत येते आणि सोबत येते एक किंकाळी तिला घाबरवण्यासाठी.  तिचा संतापाने तिळपापड झालाय आणि तो मात्र इतका धाडसी आहे की हे सर्व त्याने लग्नानंतरच्या तिच्या पहिल्या वाढदिवशी केलंय. आता पुढे. हे सर्व झाल्यानंतर त्याला लवकरच काही तरी करणं भाग आहे तेसुद्धा परिस्थिती हाताबाहेर जाण्यापूर्वी. वाघ पिंजऱ्यातून बाहेर पडलाय त्यामुळे त्याला कोणाची शिकार होण्यापूर्वी पिंजऱ्यात परत टाकणं गरजेचं आहे आणि काम आहेसुद्धा तेवढंच जिकिरीचं. आणि जर ते व्यवस्थित नाही पार पाडलं तर ह्यात जीवालासुद्धा (अगदी शब्दशः नाही पण) धोका आहे.

ती अजूनही घरी आहे आणि अजूनही विचार करतेय की जे झालं ते खरंच झालं की हे एक दुःस्वप्न आहे. तो हे असं काही तरी कसं बरं करू शकतो. मी काय विचार केलेला की तो हे करेल आणि ते करेल म्हणून आणि त्याने काय केलं तर हे. ती जामच तापलीये तेवढ्यात दारावरची बेल वाजते. ती रागातच दरवाजा उघडते. पण दारात कोणीच नाहीये. ती दरवाजा बंद करणार तेवढ्यातच पायाशी तिला काही तरी दिसतं. ती ते बघताच खुश होते. बघते तर काय एका छोट्या बास्केटमध्ये मांजरीचं पिल्लू असतं. मांजर म्हणजे तिचा सर्वात आवडता प्राणी आणि ती कधीपासून त्याच्या मागे लागलीये की आपण एका मांजर पाळूया म्हणून. पण तरीही ती त्याला अजून माफ करणार नाहीये, जे त्याने सकाळी केलं त्याच्याबद्दल.

आता त्याला माहितीये की ती शांत झालीये पण एवढीही नाही की त्याला माफ करेल. त्यामुळे त्याला पुढची चाल खेळायला हवीच. तो तिला फोनवर मेसेज पाठवतो – ‘I am sorry. मी जे केलं ते करायला नको होतं. पण तुला मांजरीचं पिल्लू आवडलं का? संध्याकाळी भेटूच. प्लीज मला मारू नको हा घरी आल्यावर. Anyway तुझं आवडीचं ice cream मी फ्रिजमध्ये ठेवलंय.
’

ती मेसेज वाचून लगेच फ्रीजकडे पळते. तिथे तिच्या आवडीचं चॉकोलेट ice cream असतं. ती ice क्रीमच झाकण उघडते तर काय आश्चर्य. आत झाकणाला आतून चिकटवलेली एक स्टिकी नोट असते – 'वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा. आता मी तुझा स्टिकी नोट्स वापरण्याचा मालकी हक्क थोड्या वेळासाठी भाड्याने घेतो. आणि त्याचा परतावा घरी आलो की मी देईनच पण सध्या आपण treasure हंट खेळूया. तुला आपण सोबत असताना घरासाठी घेतलेली पहिली गोष्ट आठवते का?'

ती आठवण्याचा प्रयत्न करते. ती तर चहाच्या सेटची लहान प्रतिकृती होती. किती प्रेमाने आपण घेतली होती आणि मला पाहताक्षणीच ती खूप आवडली होती. आपल्या शोकेसमध्ये ठेवलीये आपण ती. असं विचार करत ती त्या सेटजवळ येते. तर चहाच्या पॉटमध्ये तिला एक चावी मिळते. ती चावी आहे त्यांच्या लॉकरची जिथे ते त्यांची सर्व महत्वाची कागदपत्रे ठेवतात. काय बरं असेल त्या लॉकरमध्ये ठेवलेलं? लॉकर उघडल्यावर त्यात एक वेष्टनात गुंडाळलेली भेटवस्तू असते. ती वेष्टन उघडते आणि तिचा तिच्या डोळ्यांवर विश्वासच बसत नाही. ते तिचं पेंसिलने बनवलेलं चित्र असतं तेसुद्धा चार फ्रेममध्ये बनवलेलं. अप्रतिम. केले कधी ह्याने हे प्रताप. आणि मला कळलं कसं नाही. त्याला चित्रकलेची आवड आहे पण सहसा ते फक्त छोट्यामोठ्या निर्जीव वस्तूंपुरतंच मर्यादित असतं. त्यामुळे माणसाचं काढलेलं हे त्याचं पाहिलंच चित्र. त्यामुळे आता तिचं राग हळूहळू विरघळतोय. आणि का बरं विरघळू नये? कोण करतं एवढं आजकालच्या युगात जेथे एक शुभेच्छापत्र आणि दुकानातून महागातली घेऊन दिलेली गोष्ट यावर महत्वाचे दिवस संपतात आणि स्वतः दुसऱ्यांसाठी काही करण्याला वेळेचा अपव्यय समजलं जातं.

तिचा फोन वाजतो. त्याचं मेसेज असतो – 'कसं होतं ice cream?'

ती विचारते – 'कधी काढलास तू ते चित्र? अप्रतिम आहे ते. थँक्स. लवकर घरी ये ना. कधी तुला भेटते असं झालंय. '

तो प्रत्युत्तर देतो – 'अरे वाह. मिळालं पण तुला चित्र. तू तर खूपच हुशार आहेस यार. बाहेर फिरायला जायचं? तुझ्या गाडीपाशी येतेस?'

ती धावतच तिच्या गाडीपाशी येते ह्या अपेक्षेने की तो गाडीजवळच असेल आणि मग ते छानपैकी कुठेतरी बाहेर फिरायला जातील.

पण गाडीजवळ तर कोणीच नाहीये. ती गाडी उघडते पण तरी आत काहीच नाही. आता हे काय नवीन? परत मस्करी? डिकीत काही आहे का म्हणून ती डिकी उघडते तर आतून फुगे बाहेर येतात आणि बरोबर happy birthday to you गाणं चालू होतं. आत अजून काही वेष्टनात गुंडाळलेले खोके असतात. आणि त्यासोबत फुलांचा गुच्छ. ती ते खोके आणि गुच्छ उचलून वर जाऊ लागते. खोके जड आहेत. मनातल्या मनात ती म्हणते आता त्यातून दगड नाही निघाले म्हणजे मिळवलं कारण त्याचा काही भरोसा नाही. तो तिची मस्करी करण्यासाठी हे करायलासुद्धा काही कमी करणार नाही. आतापर्यंत तर तुमच्या पण लक्षात आलंच असेल की तो अगदी काहीही करू शकतो.

ती घरी परत येते आणि काय आश्चर्य घरातून तो धावत बाहेर येतो आणि तिला मिठी मारून म्हणतो 'हॅपी बर्थडे'. ती तर बिचारी स्तब्धच झालीये भूत पहिल्यासारखी. अरे चालू काय आहे आज. ज्याप्रकारे तिचा दिवस चाललंय की आता कशानेच तिला आश्चर्य वाटायला नको. त्यांच्या टेबलवर केक आणि पिझ्झाचा बॉक्स आहे आणि केकवर मेणबत्ती लावलीये. ते बघून तिच्या डोंळयातून आनंदाश्रू वाहू लागतात. तो हळूच तिला म्हणतो – 'केक कापायचा? सकाळपासून काहीच खाल्लं नाहीये मी, पोटात कावळे ओरडतायत. '

ती खुद्कन हसते आणि मग ते केक कापतात. मग जेव्हा ती पिझ्झा उघडते तर तो असतो हृदयाच्या आकारातला पिझ्झा, तेसुद्धा सॉसने हॅपी बर्थडे लिहिलेला.

तो पटकन म्हणतो आता तू परत रडण्यापूर्वी सगळ्या भेटवस्तू उघडूयात. कारण तुला जर नाही आवडल्या त्या तर मला परत करायला. तो नेहमीच असं करतो पण आता तिला त्याची सवय झालीये. त्यामुळे ती तिचा मोर्चा भेटवस्तूंकडे वळवते. त्या जड बॉक्समध्ये खुपसाऱ्या फोटो फ्रेम्स असतात आणि फ्रेममध्ये पेन्सिल स्केचेस ज्यांचा काही अर्थ लागत नसतो. ती त्याच्याकडे प्रश्नार्थक चेहऱ्याने बघते, अजून परत मस्करी? काय आहे तरी काय हे?

तो म्हणतो माझा मालकी हक्क. आता सोडावं ते jig-saw puzzle.

ती विचारते पण ह्याचं original चित्र कुठे आहे सोडवायला.

तो नाटकी अंदाजात म्हणतो - माझ्या हृदयावर कोरलंय. तू तुझ्या हृदयाचं ऐक मग तुला उत्तर मिळेल.

ती ते तुकडे जोडायला लागते आणि त्यातून अर्थपूर्ण चित्र तयार व्हायला लागतं. ते तिचंच चित्र असतं 26 भागांमध्ये बनवलेलं आधी त्याने लॉकरमध्ये ठेवलेल्या 4 भागांसह. जेव्हा शेवटी ती ते चित्र पूर्ण करते तेव्हा पुन्हा तिच्या डोळयांतून आनंदाश्रू वाहू लागतात. ह्यावेळी तो तिला थांबवत नाही. तो क्षण तो तिला अनुभवू देतो. हेच ते क्षण जे तुम्हाला जीवनात उभारी देतात जेव्हा तुम्हाला सोबतीची गरज असते. आणि तो हे व्यवस्थित समजतो. शेवटी तो क्षण अनुभवून झाल्यावर ती त्याला विचारते - हे सर्व असं करायची खरंच गरज होती का? हे सहज सोप्पं पण तर होऊ शकलं असतं. आणि तू आज खरंच ऑफिसला गेला तरी होतास का?



त्याने तिचं काढलेलं चित्र

हे विचारताच तो म्हणतो कोणता डिलिव्हरी बॉय तुला सामान दिल्यावर त्याची डिलिव्हरी रिसिप्टसुद्धा ना घेता निघून जातो? आणि ती त्याच्याकडे डोळे विस्फारत बघत राहते.

ता. क. - आता तुम्ही पण विचार करत असाल की पिझ्झा आणि केक आणायला काही 2-3 तास नाही लागत तर हा प्राणी गेला तरी होता कुठे इतक्या वेळ? तर तुम्हाला म्हणून सांगतो. तो गेला होता रक्तदान करायला हॉस्पिटलमध्ये. नेहमी तो स्वतःच्या वाढदिवशी करायचा आणि आता त्याने ठरवलंय की तिच्या वाढदिवशी करायचं म्हणून. तो आहेच मुळी थोडा वेगळा. पण हे तिला माहित नाहीये. त्यामुळे ते आपल्यामधलंच गुपित राहू दे बरं का?

# एक खेळकर रविवार

आज रविवार म्हणजे नाकर्त्याचा वार. आज मस्तपैकी ताणून द्यायची, आठवड्याची झोप पूर्ण करायची आणि पूर्ण दिवस मजा करायची असाच सहसा सगळयांचा बेत असतो. पण त्यांच्यासाठी रविवार म्हणजे सगळयात व्यस्त दिवस. तोच एक दिवस ज्या दिवशी तुम्ही तुमचे छंद जोपासायचे, आठवड्याचा वाचनाचा कोटा पूर्ण करायचा, काहीतरी नवीन आणि हटके करण्याचा प्रयत्न करायचा आणि त्याबरोबर आठवड्याची खरेदी आलीच. ती कोणाला चुकलीये. ह्या सर्व गोष्टींमध्ये दिवस कसा उडून जातो ते कळतही नाही. पण आजचा रविवार थोडा वेगळा होता. गोड गुलाबी थंडी चालू झाली होती. आणि दोघेपण आळसावलेले होते.

तो पेपर वाचत होता आणि ती पुरवणीतली कोडी सोडवण्यात मग्न होती. तेवढ्यात अचानकपणे त्याने विचारलं – 'तुला बॅडमिंटन खेळता येतं का ग?'

रविवारची हिवाळयातली जेमतेम कूस बदलणारी रम्य सकाळ, सूर्य आताच त्याचे सोनेरी पंख पसरवतोय, थंडी पण अशी गोड पडलीये की वाटावं की परत पांघरुणात शिरून अजून थोडा वेळ झोपावं आणि हा विचारतोय तुला बॅडमिंटन खेळता येतं का? अशा या गोड गुलाबी थंडीत शेकोटीसमोर बसून एक तर छान शेक घेत बसावं किंवा चादरीत मस्तपैकी गुरफटून झोपावं, कोण अशा वेळी बॅडमिंटन खेळेल? पण अजून त्यांचं लग्न पडलं नवीन आणि त्यात आताच तिचा वाढदिवस होऊन गेलेला जेव्हा त्याने एवढं सगळं केलं त्याच्यामुळे ती अजून 'नाही' नाही म्हणत त्याला तोंडावर. म्हणून त्याला ती म्हणते – 'हो. मला येतं खेळता. शाळा कॉलेजमध्ये असताना खेळलीये मी. पण आता नियमपण नाही आठवत मला. '

'भले, एकदा खेळलेल्या खेळाचे नियम कसे बरे तू विसरू शकतेस. असो मी सांगीन तुला. मी पण काही उस्ताद नाही पण येतं मला थोडंफार खेळता. तसाही आज रविवारचा आहे आणि आज आपला काही बेत पण नाहीये तर जायचं का बॅडमिंटन खेळायला? आजच्या पेपरमध्ये एक जाहिरात आहे की आपल्या बाजूलाच एक जिमखाना उघडलाय आणि सर्वांनी यावं म्हणून

त्यांनी पहिले पंधरा दिवस फुकट प्रवेश ठेवलाय. त्यांच्याकडे बॅडमिंटन कोर्ट आहे तर जायचं का?'

आता ह्याला हो सांगायचं की नाही हा तिलाच प्रश्न पडला. हळूहळू मला ह्याला तोंडावर नाही बोलायला शिकलं पाहिजे असं मनात म्हणत प्रत्यक्षात मात्र तिने म्हटलं – 'जाऊ या ना. कधी जायचं?'

'शुभस्य शीघ्रम' - तो उत्तरला. खेळायला त्याला खूप आवडतं जरी खेळाडूची शरीरयष्टी आणि दम टिकत नसला तरी. आणि खेळताना वागणं पण असं की क्रिकेट खेळत असेल तर स्वतःला तो काही सचिन तेंडुलकरपेक्षा कमी समजत नाही. आणि हीच गत प्रत्येक खेळाच्याबाबतीत. असो खेळाचा मुख्य हेतू असतो तो निखळ आनंद लुटणे आणि तो ते मात्र मनसोक्त करतो. कोणी काही का म्हणेना.

ती नाईलाजास्तव कपडे बदलते. आणि दोघांची स्वारी बॅडमिंटन खेळायला म्हणून बाहेर पडते. वाटेत तो तिला बॅडमिंटनचे नियम समजाऊ लागतो, एकवीस पॉईंटचा एक गेम असतो, सर्विस कधी बदलते आणि असं बरंच काही जेणेकरून कोर्टवर अजून वेळ ह्यात नको जायला. आणि ती संयमाने ते सारं ऐकत असते.

बोलता बोलता ते जिमखानाला पोहोचतात, एक कोर्ट खेळायला मिळवतात व खेळू लागतात. दोघेपण फारच खराब खेळात असतात, कधी शटललाच रॅकेट लागत नाही तर कधी शटल कोर्टाच्या बाहेर, दोघेही म्हशीसारखे ढिम्म धावायलाही तयार नाहीत पण आपले खेळताहेत. अशात अर्धा तास होतो. आणि तितक्यात त्याला हाका मारत कोणीतरी येतो व म्हणतो – 'मित्रा, कोर्टवर तुला परत बघून बरं वाटलं. आणि आज कोणाला माझ्यासारखं चारी मुंड्या चीत करतोयस?'

त्याच्या मित्राला बघून तो खुश होतो. ती कधी आधी त्याला भेटली नाहीये. पण ज्याप्रकारे ते बोलताहेत त्यावरून दोघे छान मित्र दिसताहेत. तो त्याच्या मित्राची ओळख करून देतो – ‘हा राहुल. पक्का पुणेकर आहे. आम्ही एकदम योगायोगाने एकमेकांना भेटलो आणि दोस्त झालो. हा एकदम जबरदस्त बॅडमिंटन खेळतो. ’

राहुल त्याला थांबवतो – ‘पुरे झाली हा मस्करी. काही योगायोग वगैरे नाही हा वैनी. हा चॅम्पियन होता ह्याच्या शाळेचा बॅडमिंटनचा. हा ह्याच्या शाळेकडून आणि मी माझ्या शाळेकडून आलो होतो आंतरशालेय बॅडमिंटन स्पर्धेत खेळायला. आणि याने माझा धुव्वा उडवला होता. आता तुमच्याशी खेळतोय तसा लेचापेचा नाही खेळत तो. तुम्हाला खेळवतोय तो. ’

‘मित्रा त्याला शतकं लोटली. म्हातारा झालो आता मी. इन हड्डीयो में जान नही रही. आता तर मी रॅकेट कशी पकडतात ते पण विसरलोय. ’ - तो भाव खात म्हणाला

‘बास झाली नाटकं तुझी’ - राहुल म्हणाला. ‘खेळतोस का एक मॅच?’

‘नक्कीच. का नाही’, तो म्हणाला. आणि ते मॅच खेळू लागले. ती मॅच बघून तिच्या डोळयांचं पारणं फिटलं. त्याच्या स्ट्रोकमधली ताकद, त्याचं कोर्टवरचं पदलालित्य, आणि लीलया सर्वत्र पोहिचण्याची क्षमता वाखाणण्याजोगी होती. तो अगदी व्यवसायिक खेळाडूप्रमाणे खेळला. असं नका समजू की राहुल वाईट खेळतो. तिथे खेळण्याराऱ्या 80 टक्के लोकांना तरी राहुलने सहज हरवलं असतं. म्हणूनच की काय लोकं स्वतःचा खेळ थांबवून त्यांचा खेळ बघत होती. त्याने शेवटी राहुलला हरवलं.

राहुलला निरोप देऊन दोघंही थकूनभागून घरी आले. ती जेवणाची तयारी करू लागली आणि तो घराची थोडी साफसफाई करू लागला. नंतर जेवणाच्या टेबलवर त्याने तिला विचारलं – ‘तू

जिल्हा स्तरावर बॅडमिंटन खेळलीयेस की राज्य स्तरावर? राष्ट्रीय स्तरावर नाही कारण नाही तर मला तुझ्याबद्दल आधीच माहित असतं. '

ती त्याच्याकडे बघतच राहिली. 'तुला काय माहित की मी बॅडमिंटन चांगलं खेळते ते? मी तर एवढी वाईट खेळले. तुझं बरोबर आहे मी राज्य स्तरावर खेळलीये शाळेत असताना पण नंतर बॅडमिंटन बंदच झालं. पण तू काय माझी प्रशस्तिपत्रक बघितलीस की काय?'

तो हसला व म्हणाला – 'नाही ग. प्रशस्तिपत्रक वगैरे काही नाही, हा फक्त माझा अंदाज होता. आणि तो अचूक असणार ह्याची मला खात्री होती. तुझ्याशी खेळताना तू जरी खेळण्याच नाटक करत असलीस तरी तुझे अँगल ऑफ अटॅक जबरदस्तच होते. आणि ते तुझ्या दर्जाची जाणीव करून देण्यासाठी पुरेसे होते. खूप सराव असल्याशिवाय तो अँगल जमणं अशक्य आहे आणि एकदा का हात जमला की तो आपसूकच खेळला जातो. तुम्ही स्वतःला नाही रोखू शकत. मला तेव्हाच शंका आली आणि हे सुद्धा कळलं की तू मला हरवू इच्छित नाहीस म्हणून खेळवतेस. मग मी पण म्हटलं ठीक आहे आपण पण करू थोडं नाटक. पण जेव्हा तू माझ्याशी राहुलच्या मॅचनंतर बोलत होतीस त्यावेळी मला म्हणालीस की मी पूर्ण मॅचमध्ये फक्त 4 एअर-शॉट खेळलो म्हणून. तेव्हा माझी खात्री पटली की तू बॅडमिंटन उत्तम खेळतेस. आता एअर-शॉट म्हणजे काय हे कळायला व्यावसायिक खेळाडूच हवा. काय बरोबर आहे ना? आणि हो पुढच्या वेळी जर नसेल खेळायचं तर तसं सांग. मी काय तुझ्यावर जबरदस्ती नाही करणार पण पुढच्या वेळी जेव्हा खेळशील तेव्हा मात्र आजच्यासारखा रडीचा डाव नाही खेळायचा. मला हरवलंस तरी चालेल, कळलं?

ती नुसती त्याच्याकडे बघत राहिली त्याच्या समजूतदारपणाचं आणि निरीक्षणशक्तीचं कौतुक करत.

ता. क. - बॅडमिंटनमधील काही संज्ञा -

1. बॅडमिंटनमध्ये जेव्हा रॅकेट शटलला ना लागता फक्त हवेतच फिरते त्याला एअर शॉट म्हणतात.

2. अँगल ऑफ अटॅक हा रॅकेटमधून ज्या अँगलमध्ये शटल निघतं त्या अँगलला म्हणतात. ड्रॉप शॉट आणि स्मॅश खेळताना अँगल ऑफ अटॅकला खूप महत्व असतं.

# एक रम्य संध्याकाळ

मंद कासवाच्या चालीने रटाळपणे शनिवारचा दिवस चालला होता. आताच दोघांचं दुपारचं जेवण आटपलं होतं. आणि दोघे पण सोफ्यावर गप्पा मारत बसले होते. थंडीचे दिवस चालू होते आणि रोज पहाटे सर्वत्र धुकं पसरायचं. आणि वातावरण धुंद करून जायचं.

दोघेपण प्रत्येक ऋतूचा त्याच्या गुणदोषांसकट आनंद अनुभवतात. त्यामुळे दोघांचापण वीक एन्डला घरी बसण्यापेक्षा बाहेर भटकण्यावरच भर असतो. आणि आता त्यानेच मनात असेल ते बोलण्याची एवढी मोकळीक दिल्यावर ती जराही काही बोलताना कचरत नाही. त्यामुळे घरी बसून कंटाळलेल्या तिने त्याला विचारलं – 'बाहेर किती छान वाटतंय. बाहेर जायचं का कुठेतरी फिरायला?'

त्या दोघांचीही सर्वात खास गोष्ट म्हणजे दोघेही मनस्वी आणि स्वछंदी. मनात येईल तसं वागणारे आणि मनात येईल ते करणारे. ह्याचा अर्थ असा नाही की ते बेजबाबदार आहेत. पण एकंदरीतच छोट्या छोट्या गोष्टींमध्ये सुख शोधणाऱ्या आणि जीवनाकडून खूप जास्त अपेक्षा नसलेल्या त्यांना कशातही आनंद गवसण्याचं रहस्य कळलंय. त्यामुळेच ते सुखी आहेत.

असो तर तिने विचारताच तो एका पायावर तयार झाला. त्याला काय त्याच्या बाईकवरून फिरायला बहाणाच पाहिजे असायचा आणि तिलाही ते आता व्यवस्थित माहितीये. दोघांनाही गाडीपेक्षा बाईक जास्त प्रिय आणि त्यामुळे अगतिच गत्यंतर नसल्याशिवाय सर्वत्र ते बाइकवरूनच फिरायचे. तसंही त्यांचं त्या बाईक बरोबर एक वेगळंच नातं जडलंय. त्याची स्वकमाईची ती पहिलीच एवढी महाग गोष्ट. त्याला त्याच्या आई बाबांनी स्पष्टपणे सांगितलं होतं की बाईक हवी तर तू ती तुझी तूच घ्यायची त्यामुळे नोकरी सुरु झाल्यापासून पै पै जमवून त्याने स्वकष्टाने ती घेतल्याने साहजिकच त्याचा ती जीव की प्राण होती. आणि लग्नापूर्वी त्या बाईकवर तिच्यासोबत फिरल्याने तिला त्याला समजून घेण्यात त्या बाईकचा सिंहाचा वाटा

होता. असो पुन्हा भरकटलो. तर तो बाहेर जाण्यास एका पायावर तयार आहे आणि दोघेही बाहेर जाण्यास सज्ज. आता पुढे.

‘कुठे जायचं?’ - त्याने विचारलं.

‘कुठेही चालेल. फक्त घरी ठोंब्यासारखं बसून कंटाळा आलाय. ’ - तिने सांगितलं.

‘ठीक आहे. तुला एक फक्कड जागी घेऊन जातो पण एक अट आहे. नाही म्हणायचं नाही. मान्य आहे?’ - त्याने विचारलं.

‘आप की सारी शर्ते मंजूर जनाब. हुकुम फरमाईये मेरे आका’ - तिने एकदम फिल्मी स्टईलमध्ये म्हटलं.

तो स्मितहास्य करत म्हणाला – ‘मस्तपैकी आलं घातलेला चहा भर थर्मासमध्ये आणि वाटेत आपण वडापाव घेऊ. छानपैकी वडापाव खात आणि चहा पीत सूर्यास्त बघू या. आणि परत येऊ या. काय म्हणतेस?’

‘नेकी और पूछ पूछ. अब जब थान ली है पार्टनर तो देर किस बात की? चहा तर मी करतेच पण आपण चाललोय तरी कुठे?’ - तिने विचारलं.

‘ते गुपित आहे. तू फक्त हे लक्षात घे की आपण तासभर तरी बाईकवर असणार आहोत तिथे पोहोचेपर्यंत. ’

‘ठीक आहे. माझ्याच्याने आता धीर धरवत नाही’ - असं म्हणत ती चहा करायला निघून गेली. मी म्हटलं ना की अगदी लहान सहान गोष्टीतलं पण सुख ते अनुभवतात म्हणून.

चहा थर्मासमध्ये घालून आणि नाक्यावरून गरम गरम वडापाव घेऊन दोघांची स्वारी निघाली. आता गम्मत अशी की बाहेर जायची आयडिया तिची पण तिलाच माहित नाही की ते कुठे चालले आहेत ते. तरी तिची खात्री होती की ज्या कोणत्या जागी आपण चाललोय ती जागा

खासच असणार. हा आहे त्यांच्या नात्यातला दृढ विश्वास. आणि तोही तिला बिलकुल निराश करत नाही. दोघेही निसर्गाचा मस्त आनंद लुटत पोहोचतात ताम्हिणी घाटात. मुंबई पुणे मुंबई चित्रपटामध्ये म्हटलंय ते खरंय की पुण्याला निसर्ग हा अगदी हाकेच्या अंतरावर असतो, मुंबईसारखं नाही. छान निसर्गरम्य दृश्य बघून ते थांबतात. तो वडापाव उघडतो आणि ती थर्मासमधून चहा. चहा कपमध्ये ओतते आणि एक कप त्याला देते. आणि एक स्वतः घेते.



ताम्हिणी घाटातील ते दृश्य जिथे ते बसून चहा पितात

चहाचा पहिलाच घोट घेते आणि त्याचा चहा खेचून परत घेते.

तो तिच्याकडे पाहतच राहतो. आता हे काय वागणं झालं. सरळ सरळ हातातून चहाचा कप काढून घेतला म्हणजे?

ती म्हणते – ‘चहा जास्त उकळला गेलाय. सॉरी. तुला नाही आवडणार. ’

तो म्हणतो – ‘मला चालेल. ’

ती अजूनही चहा त्याला द्यायला काही तयार नाही. 'अरे चहा गार पण झालाय. आपला थर्मास खराब झालाय वाटतं. '

तो म्हणतो – 'चांगल्या वाफा येताहेत. अजून किती गरम पाहिजे. आणि आपल्याला तर फक्त चहा हवाय. थंड गरम चालेल काही पण. वडापावसोबत चहाला काही औरच मजा आहे. दे ना चहा. भाव नको खाऊस. '

तिचा नाइलाज होतो आणि शेवटी ती सांगते की – 'सॉरी पण मी घाईघाईत चहात साखरच नाही टाकली रे म्हणून. '

तो ते ऐकून हसायलाच लागतो.

ते बघून ती रागावते व म्हणते – 'हसण्यासारखं काय आहे त्याच्यात. होतं असं कधी कधी. आणि तूच निघायची घाई करत होतास म्हणून झालं हे सगळं. नाही तर नसतं झालं. '

तो म्हणतो की – 'वाह रे वाह म्हणजे साखर टाकायला तुम्ही विसरायचं आणि चुकी मात्र आमची. '

'आहेच मुळी तुमची. तू घाई नसती केलीस तर. . . '

तो तिला अर्ध्यावरच थांबवतो व म्हणतो – 'त्यासाठी नाही हसलो मी. मी ह्यासाठी हसलो की मी तुला खूपच छान ओळखतो म्हणून हे अपेक्षित होतं मला म्हणूनच मी' - खिशातून साखरेची पिशवी काढत तो म्हणतो – 'साखर आणलीये सोबत. . . '

'डायबेटीस होणारेय तुला माकडा' असं म्हणत ती त्याच्या हातून साखर काढून घेते चहात टाकण्यासाठी.

# समारोप

दोघांचंही लग्नानंतरचं पाहिलं वर्ष कसं सरलं ते तुम्ही पाहिलंत. थोडी मस्करी, थोडी मजा, थोडी भांडण, थोडी सजा. हीच तर जीवनाची लज्जत आहे.

लिहायला भरपूर आहे आणि रोजच अशा गमती जमती चालू असतात पण प्रत्यक्ष गोष्ट काही लिहिता येत नाही. त्यामुळे इथेच थांबतो. पण रोजची येती दिवाळी दसराप्रमाणे ह्यांच्याही करामती रोजच चालू राहतील त्यामुळे तुम्हाला जर त्या आवडल्या तर येऊ पुन्हा तुमच्या भेटीला नव्या कारामतींसह. तोपर्यंत तुम्ही तुमचे अनुभव कळवा, अनुभवा आणि ह्याहून जास्त महत्वाचं म्हणजे ते अनुभव जगा कारण जीवन लहान आहे आणि जगणे मात्र महान. पुन्हा भेटूच.

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान मराठी साक्षरांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि लेखक व कवींना एक सशक्त व्यासपीठ मिळावे या दुहेरी हेतूने स्थापन झाले. मराठीत एक जबरदस्त वाचन संस्कृती निर्माण व्हावी, तरुणांनी भरपूर वाचन करावे, ग्रामीण भागातील तरुणांना मोबाईलवर पुस्तके उपलब्ध व्हावीत, परदेशस्थ मराठी वाचकांना सहजासहजी इंटरनेटवर पुस्तके मिळावीत हे आमचे स्वप्न. जगातील चाळीस देशांतील सुमारे साडेतीन लाख वाचक या चळवळीचे सभासद आहेत त्याशिवाय वर्षाला सुमारे तीस ते चाळीसलाख वाचक . वेबसाईटवरून पुस्तके डाऊनलोड करतात.

पण आम्ही याने समाधानी नाहीकोटी लोक मराठी बोलतात १२ .. त्यातले किमान सहा कोटी वाचक व्हावेत हे आमचे लक्ष्य आहेआणि आमची ही . इच्छाजर योग्य असेल तर कायनात वगैरे सोडाआमचे वाचक तरी त्याच्यासाठी , .काही करतील ही अपेक्षा आहे

आमच्या वाचकांना एकच विनंती. आपल्या ओळखीच्या किमान दहा साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला पाठवा. अशा रितीने आपण तीनाचे तीस आणि तिसाचे तिनशे होऊ. या मराठीचिये नगरी ब्रह्मविद्येचा सुकाळू व्हायला वेळ नाही लागणार. सर्वांची साथ असेल तर.

एवढी विनंती मान्य कराच.

ई मेल पत्ते esahity@gmail. com या पत्त्यावर पाठवा बरं!